# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ११.०५.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**कपिलनगर पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द वेगवेगळ्या कारवाई सुरू आहेत.

दिनांक १०.०५.२०२६ चे २३.२५ वा. ते दिनांक ११.०५.२०२६ चे ००.४० वा. चे दरम्यान, कपिलनगर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत, हॉटेल रंगला पंजाब, नारी रोड, टेका नाका, नागपूर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे एका खोलीमध्ये तीन ईसम एका काचेच्या पॉटमधून हुक्का ओढून धुम्रपान करतांना समक्ष मिळून आले. त्यांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी आपले नावे क्र. १) जसप्रितसिंग गुरूप्रितसिंग तुली, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. ४६१, बुध्द नगर, पाचपावली, नागपूर २) आदित्य मल्लीक इंगळे, वय २६ वर्षे, रा. श्रीराम बेकरी जवळ, झिंगाबाई टाकळी, नागपूर ३) शादाब सलीम शेख, वय २९ वर्षे, रा. तकीया दिवाणशहा, मोमीनपूरा, तहसिल, नागपूर असे सांगितले. पोलीसांनी हुक्का पार्लर मालकाबाबत विचारणा केली असता, सोहेल खान फिरोज खान, वय २२ वर्षे, रा. नवीन वस्ती टेका, जब्बार पहलवान चे घराजवळ, पाचपावली, नागपुर हा असल्याचे समजले. हुक्का पार्लर मालक आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता अवैधरित्या ग्राहकांना विनापरवाना व प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का फ्लेव्हरचे तंबाखु, हुक्का पॉट, रबरी पाईप व ईतर साहित्य असा एकुण १०,१५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कपिलनगर येथे कलम ४, ६, ७ ,८, २०, २१, २४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, सहकलम ३३(डब्लू), १३१ म.पो.का. सहकलम २७२ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग), वपोनि. सतिश आडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोउपनि. योगेश नालटे, पोहवा. शहजाद शेख, पोअं. निलेश पवार, रितेश वर्मा व संजू भुषणम यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे अंबाझरी :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सुधीर जगदीश चुटे, वय ५० वर्षे, रा. प्लॉट क्र. २१, वैष्णवसाई अपार्टमेन्ट, फ्लॅट नं. १०२, दिघोरी, स्मृतीनगर, हुडकेश्वर, नागपूर यांचा मुलगा नामे तुषार सुधीर चुटे, वय २० वर्षे याचे दोन मित्र असे दिनांक ११.०५.२०२६ चे ०२.०० वा. ते ०२.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील कॅफे

हाऊस चौक ते लॉ कॉलेज चौक रोडवरील द स्लीप कंपनी दुकानसमोर एका पाढऱ्या रंगाच्या ॲक्टीवावरील वय अंदाजे १८ ते १९ वर्षे वयोगटातील दोन अनोळखी आरोपी मुलांनी रोडवरून स्कुटर चालवित असतांना झालेल्या वादाच्या कारणावरून, फिर्यादीचे मुलास अश्लील शिवीगाळ करून हात बुक्कीने मारहाण केली. तसेच, ॲक्टीवावरील आरोपींपैकी मागे बसलेल्या मुलाने त्याचे जवळील चाकुने, फिर्यादीचे मुलास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने वार करून गंभीर जखमी केले. गंभीर जखमी फिर्यादीचा मुलास उपचारकामी मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान त्यास डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

यात्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. नंदकिशोर पदकोंडे ७२१९४१७९०० यांनी पांढऱ्या रंगाच्या ॲक्टीवा चालक व सोबती अशा दोन अनोळखी आरोपीविरूध्द कलम १०३(१), ११५(२), ३(५), ३५२ भा.न्या.सं. सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, घर नं. १४४७/ई/२३१ नाईक तलाव, बांगलादेश, मराठा चौक, नागपुर येथे राहणारे फिर्यादी मुकुदा वसंता नागरीकर, वय ३८ वर्षे हे वरच्या माळ्यावर राहत असून, त्यांचा लहान भाऊ हे कामनिमित्य दिल्ली येथे व भावाची पत्नी ह्या त्यांचे आईकडे बहादुरा येथे गेल्या होत्या. दिनांक १०.०५.२०२६ चे ००.१५ वा. ते दिनांक ११.०५.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाज्याला कुलूप लावून वरच्या माळ्यावर झोपण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी कोंडा तोडून, आंत प्रवेश करून, हॉलमधील लाकडी कपाट तसेच, बेडरूममधील लोखंडी आलमारीचे लॉक तोडून, कपाटाचे लॉकर मधून रोख १,६०,०००/—रू. व सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,८०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. सुनिल तिडके यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे मानकापूर :—** सौ. आफरीन फातमा उर्फ हानिफा अमान अली, वय २४ वर्षे, रा. ताज नगर, बोमणे ले—आऊट, मानकापूर, नागपूर ह्या दिनांक २४.०३.२०२६ चे १५.०० वा. पासुन पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबूत, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— काळ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात.

**२) पोलीस ठाणे कोतवाली :—** सौ. विद्या भारत जाधव, वय ४५ वर्षे, रा. घाडगे टाका, पांडूरंग वाचनालय जवळ, कोतवाली, नागपूर ह्या दिनांक ०४.०५.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



आफरीन



विद्या

स्वा/–

( नितीन चुलपार )
सहा.पोलीस निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.